


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २७९ ●शुक्रवार,दि.०९ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955



## अजित पवार महाराष्ट्राचे 'आका'! भाजपा आमदाराचा आरोप...

**पुणे । प्रतिनिधी**

'उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी स्वतःच्या मुलाचा पराक्रम पाहावा. त्यानंतर आमच्यावर टीका करावी. पवार हे स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपबरोबर आले असून, तेच महाराष्ट्राचे 'आका' आहेत, असा आरोप भाजपचे भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी केला.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक प्रचाराला सुरुवात झाल्यापासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिकेतील भ्रष्टाचारावरून आणि महापालिका कर्जबाजारी केल्यावरून भाजपच्या स्थानिक नेत्यांवर टीका करत आहेत, या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी ही टीका केली.

**▶ आमदार महेश लांडगे म्हणाले, 'स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपबरोबर आलेल्या अजित पवारांनी आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करू नयेत. मला पिंपरी-चिंचवडचा 'आका' म्हणत आहेत, मुळात पवार हेच महाराष्ट्राचे 'आका' आहेत. पवारांनी स्वतःच्या लेकाचे पराक्रम पाहावे आणि ते स्वतः 'आका' आहेत, हे त्यांनी जाहीर करावे. ते नैराश्यातून आरोप करत आहेत. आमच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध करायचे असतील, तर मी, महापालिका अधिकारी आणि अजित पवार यांनी समोरासमोर बसावे. मग सर्व उत्तरे मिळतील.**

**▶ 'महापालिकेतील भ्रष्टाचाराचा 'आका' संपवणार आहे. मी कोणाच्या नादी लागणार नाही. विनाकारण माझ्या नादाला कोणी लागले, तर सोडणार नाही. ज्या गावच्या बोरी, त्या गावच्या बाभळी असतात. त्यामुळे कोणाला घाबरायचे नाही,' असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले होते.**

भाजपने महापालिका कर्जबाजारी केली. ठेवी मोडल्या आहेत. ४० हजार कोटी रुपयांची कामे कुठे झाली आहेत, याची उत्तरे द्यावीत. त्याला (महेश लांडगे) नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष केले. स्थायी समितीत काय करायचे ते केले आणि आमदार झाला. आता संपत्ती कशी वाढली. दादागिरी किती वाढली आहे, अशी टीका नाव न घेता आमदार महेश लांडगे यांच्यावर केली होती. त्याला आता लांडगे यांनीही उत्तर दिले आहे. त्यामुळे अजित पवार आणि भाजप आमदार महेश लांडगे यांच्यातील आरोप-प्रत्यारोप वाढले आहेत.

दरम्यान, महेश लांडगेंच्या टीकेवर बोलताना अजित पवार म्हणाले की, मी कोण आहे जनता ठरवेल. १५ तारखेपर्यंत कळ काढा उत्तर देतो असे अजित पवार म्हणाले. राष्ट्रवादीकडून एक अलार्म पाच काम हे कँपेन सुरू होत आहे. पुण्यातील खड्डे, कचरा, ▶ उर्वरित पान २ वर

## पोटच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधम बापास 7 वर्षे सक्तमजुरी; शिरूर कासार पोलिसांच्या तपासाला यश

**शिरूर का. । प्रतिनिधी**

स्वतःच्या १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम पित्याला बीड येथील विशेष सत्र न्यायालयाने सात वर्षांच्या सश्रम कारावासाची कठोर शिक्षा सुनावली आहे. न्यायमूर्ती एस. एस. घोरपडे यांनी उपलब्ध पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबाचा सखोल विचार करून हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. ही संतापजनक घटना १६ ऑगस्ट २०२४ रोजी उघडकीस आली होती. आरोपी वडिलांनी आपल्याच मुलीला वारंवार शारीरिक मारहाण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. पित्याच्या या छळाला कंटाळून पीडितेने १८ ऑगस्ट २०२४ रोजी शिरूर कासार पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शिरूर कासार पोलिसांनी तातडीने भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली होती. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत कौशल्याने पूर्ण केला. त्यांनी न्यायालयात भक्कम पुरावे आणि दोषारोपपत्र वेळेत सादर केले.

▶ उर्वरित पान २ वर

## सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी मोठी अपडेट; कोर्ट म्हणालं, आरोपींना पेन ड्राईव्ह द्या, नेमकं काय झालं आजच्या सुनावणीत?

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी मोठी अपडेट समोर आली आहे. या बहुचर्चित प्रकरणाने राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच ढवळून निघालं आहे. या हत्याकांड प्रकरणी गुरुवारी (८ जानेवारी) बीड येथील विशेष मकोका कोर्टात झाली. या सुनावणीत पुराव्यांची देवाणघेवाण, आरोपींचे अर्ज आणि तांत्रिक कागदपत्रांवरून




जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता २३ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.

या प्रकरणातील महत्त्वाचे डिजिटल पुरावे असलेले पेन ड्राईव्ह सर्व आरोपींना उपलब्ध करून द्यावेत, असे आदेश कोर्टाने दिले आहेत. पुराव्यांच्या पारदर्शकतेसाठी ही मागणी आरोपी पक्षाकडून करण्यात आली होती. त्यावर कोर्टान आरोपींना पेन ड्राईव्ह देण्याचे निर्देश दिले आहेत. त्याचबरोबर लॉपटॉपची क्लोन कॉपी आणि तपासी अधिकाऱ्यांचे म्हणणे आरोपी पक्षाने पुराव्याचा भाग म्हणून लॉपटॉपची 'क्लोन कॉपी' मिळावी, अशी मागणी कोर्टासमोर केली. यावर तपासी अधिकारी आणि सरकारी पक्षाने आपले म्हणणे मांडण्यासाठी वेळ मागितला असून, येत्या १५ कार्यालयीन दिवसांत यावर लेखी उत्तर सादर करण्याचे आश्वासन दिले आहे. या खटल्यातील काही आरोपींनी आपले वकील बदलण्याची मागणी केली आहे. यावर विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी आपले लेखी म्हणणे सादर करावे, असे निर्देश कोर्टाने दिले आहेत. या प्रकरणातील एक प्रमुख आरोपी विष्णू चाटे याने आपले कारागृह बदलून मिळावे, यासाठी कोर्टाकडे ▶ उर्वरित पान २ वर

## पुढील गुरुवारी शाळा, कार्यालयांना सुट्टी! राज्य सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात सध्या महापालिका निवडणुकांचा रणसंग्राम शिगेला पोहोचला आहे. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात असतानाच मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मतदानाच्या दिवशी १५ जानेवारी २०२६ रोजी गुरुवारी महाराष्ट्रातील काही भागांत सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ज्या ठिकाणी महानगरपालिका निवडणुका होत आहे त्या-त्या ठिकाणी शाळा आणि सरकारी कार्यालयांचे कामकाज बंद राहणार आहे. महापालिका निवडणुकांसाठी राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. मतदानाचा दिवस नागरिकांना सुलभ व्हावा, यासाठी राज्य सरकारने सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. ही सुट्टी मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे, नागपूर, नाशिक यांसह ज्या-ज्या महानगरपालिकांमध्ये मतदान होणार आहे, त्या सर्व ठिकाणी लागू असणार आहे. ज्या महानगरपालिका क्षेत्रांमध्ये मतदान आहे, त्या ठिकाणी गुरुवारी १५ जानेवारी रोजी शाळा, महापालिका कार्यालये आणि अन्य शासकीय कार्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे. मात्र ही सुट्टी संपूर्ण राज्यासाठी नसून फक्त निवडणूक होणाऱ्या महानगरपालिका क्षेत्रांपुरतीच मर्यादित असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

▶ उर्वरित पान २ वर

## बीडच्या माजलगावमध्ये एटीएसची मोठी कारवाई; दोन जणांना घेतलं ताब्यात, चौघांवर गुन्हा दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

धार्मिक कार्याचा मुखवटा वापरून आर्थिक गैरव्यवहार केल्याचा गंभीर प्रकार बीड जिल्ह्यात उघडकीस आला आहे. बनावट ट्रस्ट आणि चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे कोट्यवधी रुपयांचा निधी जमा करून तो स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याचा प्रकार समोर आल्यानंतर दहशतवाद विरोधी पथकाने थेट कारवाई करत माजलगाव तालुक्यात छापा टाकला आणि दोन जणांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणामुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती




अशी की, अहिल्यानगरच्या फैजान ए-कन्झूल इमान या ट्रस्टचा नोंदणी क्रमांक वापरून गुलजार ए-रझा ट्रस्टच्या नावाने लातूरमध्ये पाच वेगवेगळी खाते उघडून धार्मिक कामाच्या नावाखाली चार कोटी ७३ लाख ६७ हजार ५०३ रुपयांचा निधी जमा करण्यात आला. संबंधित रक्कम स्वत:च्या फायद्यासाठी वापरण्यात आल्याप्रकरणी छत्रपती संभाजीनगरच्या दहशतवाद विरोधी पथकाने बीड जिल्ह्यातील माजलगाव शहराजवळील पात्रुड गावात गुरुवारी सायंकाळी ४.३० च्या सुमारास छापा मारून दोघांना ताब्यात घेतले, तर चार जणांविरुद्ध माजलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईबाबत बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कामत यांनी दुजोरा दिला आहे.

इमरान कलीम शेख (सदर बाजार, अंबाजोगाई), मुज्जम्मिल नूर सय्यद (सत्तार गल्ली पात्रुड), अहमदुद्दीन कैसर काझी (रोजा मोहल्ला, केज) व तौफीक जावेद काझी, अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. ▶ उर्वरित पान २ वर

## पोलीस असल्याची बतावणी करून वृद्धास लुटले

**धारूर । प्रतिनिधी**

भरदिवसा पोलीस असल्याचा बनाव करून एका वृद्ध शेतकऱ्याची फसवणूक करून सोन्याची अंगठी चोरून नेल्याचा धक्कादायक प्रकार धारूर शहरात घडला आहे. चंद्रकांत गोविंदराव तिडके, वय ६६ वर्षे, राहणार रुई धारूर हे ७ जानेवारी रोजी दुपारी १२:४० वाजता बस स्थानकाकडून बँकेकडे जात असताना एका अनोळखी इसमाने त्यांना अडवले. 'मी पोलीस खात्यात आहे, तुमच्याकडे काय सामान आहे ते तपासायचे आहे' असे म्हणून त्या भामट्याने तिडके यांचा विश्वास संपादन केला.

तपासणीच्या बहाण्याने त्या अज्ञात इसमाने तिडके यांच्या हातातील २५ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी घेतली. त्यानंतर हातचलाखी करून त्याने तिडके यांना दुसरी जुनी अंगठी देऊन त्यांची खरी सोन्याची अंगठी लंपास केली आणि दुचाकीवरून पसार झाला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तिडके यांनी पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणी धारूर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार दुधाने या गुन्ह्याचा तपास करत आहेत.

## दु:खावर फुंकर घालणारी पत्रकारांची माणुसकी

**डोंगरे कुटुंबासाठी मदत फेरीतून उभारला एक लाखांचा भक्कम आधार**




**वडवणी । प्रतिनिधी**

डोंगरेवाडी येथील ऊसतोड मजुर गणेश डोंगरे यांचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्याने एका कष्टकरी कुटुंबाचा कणा मोडला. कुटुंबाचा आधारवड हिरावल्याने वयोवृद्ध आई-वडील,पत्नी आणि मुलींवर दुःखाचा डोंगर कोसळला. अशा अत्यंत वेदनादायी परिस्थितीत वडवणी तालुक्यातील पत्रकारांनी केवळ बातमीपुरते मर्यादित न राहता माणुसकीचा झेंडा उंचावत थेट मदतीसाठी पुढाकार घेतला. पत्रकारांच्या वतीने काढण्यात आलेल्या मदत फेरीला वडवणी शहरातील व्यापारी बांधवांसह नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. व्यापारी, व्यावसायिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांनी डोळ्यांत करुणा आणि मनात सहवेदना ठेवून सढळ हाताने मदत केली. या एकजुटीच्या प्रयत्नातून तब्बल एक लाख रुपयांची रक्कम जमा झाली आहे. ही रक्कम मृत ऊसतोड कामगाराच्या मुलींच्या शिक्षण आणि उज्ज्वल भविष्यासाठी त्यांच्या नावाने बँकेत मुदत ठेव (एफडी) स्वरूपात ठेवण्यात येणार आहे. कर्त्या पुरुषाच्या अकाली जाण्याने पोरकं झालेलं कुटुंब पुन्हा उभं राहावं, मुलींच्या शिक्षणात कोणतीही अडचण येऊ नये, या उदात्त हेतूने पत्रकार बांधवांनी सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम ▶ उर्वरित पान २ वर









## मतदान हा आपला अधिकार आणि कर्तव्यसुद्धा !

लोकशाही पद्धतीमध्ये निवडणूक प्रक्रियेला अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे ही प्रक्रिया एखाद्या उत्सवाप्रमाणे पार पडते. राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते या उत्सवात हिरीरीने सहभागी होत असले, तरी या उत्सवाचा उत्सवमूर्ती असतो तो 'मतदारराजा'. त्याच्या उपस्थितीशिवाय या उत्सवाला अर्थ नसतो. त्याला या सर्व प्रक्रियेत केवळ एकदा सहभागी व्हायचे असते. स्वतःच्या, आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या, भवितव्याचा निर्णय त्याला या एका दिवसात घ्यायचा असतो त्यामुळे तो योग्यही असायला हवा हे पाहण्याचे दायित्वही त्याचेच असते. मतदानाचे महत्व किती आहे हे जुन्या जाणत्या मतदारांना ठाऊक नाही असे नाही तरीही निवडणूका जवळ आल्या की प्रशासन मतदारांमध्ये जागृती कारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असते. विविध प्रसिद्धी माध्यमांसह सामाजिक माध्यमांवर मतदान करण्याबाबत जागृती करण्यासाठी जाहिराती दिल्या जातात. गर्दीची ठिकाणे, प्रवासी वाहने यांतूनही मतदारांचे प्रबोधन केले जाते. केवळ मतदारांना जागृत करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. एव्हढे सर्व करूनही मतदानाचा टक्का जेमतेम पन्नाशी पार करतो. ज्या व्यवस्थेत देशातील केवळ पन्नास टक्के जनताच ती घडवण्यात सहभाग घेते ती व्यवस्था सक्षम आहे असे कसे म्हणता येईल. चार चौघांत या लोकशाही व्यवस्थेचे वाभाडे काढणारी, राज्यकर्त्यांना शिव्या देणारी, राज्याच्या आणि देशाच्या बिघडलेल्या स्थितीवर तोंडसुख घेणारी जनता जेव्हा या सर्वांमध्ये बदल घडवण्याची संधी आपल्या हाती मिळते तेव्हाच पळ का काढते ? माझा समाज, महा जिल्हा सक्षम व्हायला हवा, येथील जनता सुखाने नांदायला हवे, येथील नागरिकांना सर्व सोयी-सुविधा आणि संरक्षण मिळायला हवे त्यामुळे यापुढे असे करून चालणार नाही. लोकशाही सक्षम करायची असेल तर सर्वप्रथम मतदान करण्यासाठी घराबाहेर पडायला हवे. त्याहीपुढे जाऊन आपल्या घरातील आणि आपल्या परिसरातील कोणी मतदाता मतदानापासून वंचित राहू पाहत असेल तर त्याचेही प्रबोधन करून त्याला मतदान करण्यास प्रवृत्त करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्यच आहे. लोकप्रतिनिधींच्या कामाबद्दल आपला रोष आपण वर्षभर प्रकट करतच असतो मात्र त्यांना अद्दल घडवण्याची आणि योग्य लोकप्रतिनिधी निवडण्याची संधी आपल्याला पाच वर्षांतून एकदा मिळते ती दवडता कामा नये. यंदा तर ही संधी तब्बल आठ वर्षानंतर मिळते आहे. गेल्या काही वर्षांत शहरांतील अनेक मंडळी आपली शहरातील घरे विकून अथवा भाड्याने देऊन अंबरनाथ, बदलापूर, वांगणी यांसारख्या ठिकाणी स्थलांतरित झाली आहेत; मात्र त्यांचे नाव अद्यापही शहरातील त्यांच्या घरांच्या पत्यावरील मतदार याद्यांमध्ये आहे अशा मंडळींना मतदानासाठी वेळ काढून बोलावण्याचे कामही शेजारी राहणाऱ्या मंडळींनी करावे. शहराबाहेर गेलेली ही सर्वच मंडळी मतदानासाठी एव्हढ्या लांबून येतील असेही नाही; मात्र यातील काहीजण तरी आपण केलेल्या आग्रहामुळे लाजेखातर का होईना शहरात मतदान करण्यासाठी नक्कीच येतील. याचसोबत आपल्या शेजारी राहणाऱ्या मंडळींपैकी कोणी मतदानाच्या दिवशी सहलीचे नियोजन करत असेल, तर अशांचेही प्रबोधन करून त्यांचे नियोजन हाणून पाडण्याचे दायित्व आपण घेऊया. प्रमुख शहरांतील निवडणूका अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जातात बऱ्याचदा येथील निकालांवर राज्यातील जनमताचा कौल लक्षात घेतला जातो त्यामुळे या ठिकाणची टक्केवारी वाढवणे राजकीय पक्षांसाठी जिकरीचे असते. शिवाय शहरातील मतदान केंद्रे ही बऱ्याचदा घरापासून एक ते दीड किलोमीटरच्या अंतरातच असतात त्यामुळे ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात मतदान अधिक होणे अपेक्षित असते; मात्र दुर्दैवाने तसे घडत नाही. 'माझ्या एका मताने काय फरक पडणार आहे' ही मानसिकता लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. २००४ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत उमेदवार ए. आर. कृष्णमूर्ती यांना ४०७५१ मते पडली, तर त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराला ४०७५२ मते पडली, परिणामी ए. आर. कृष्णमूर्ती यांचा केवळ एका मताने पराभव झाला. २००९ च्या राजस्थान राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री पदाचे दावेदार असलेले सी.पी. जोशी यांना ६२२१५ मते पडली, तर त्यांच्या विरोधात उभे राहिलेल्या कल्याण सिंह चौहान यांना ६२२१६ मते पडली. अटीतटीच्या या लढतीमुळे सी.पी. जोशी यांना आमदारकीसह मुख्यमंत्री पदावरही पाणी सोडावे लागले. १९९९ साली अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना विरोधी पक्षांनी विद्यमान सरकारविरोधात अविश्वास ठराव आणला. वाजपेयी या ठरावाला हिमतीने सामोरे गेले. या ठरावावर झालेल्या मतदानात अटल बिहारी वाजपेयी यांच्या बाजूने २६९ मते पडली, तर विरोधात २७० मते पडली. केवळ एका मताच्या फरकामुळे वाजपेयी सरकार १३ दिवसांतच कोसळले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मतदारांची संख्याही अल्प असल्याने याठिकाणीही अशाप्रकारची चुरस असते. अनेकद उमेदवार हाताच्या बोटावर मोजता येईल इतक्या फरकाने निवडून येतात. एका मताचे महत्व सांगणारी अशी अनेक उदाहरणे जगाच्या राजकारणात होऊन गेली आहेत त्यामुळे एक मताने काय फरक पडणार आहे असे म्हणणेच मुळात चुकीचे आहे. लोकांच्या मनात लोकशाही किती रुजली आहे हे निवडणुकांतील मतदानाच्या टक्केवारीवरून दिसून येते. विश्वातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून बिरुद मिरवणाऱ्या भारतातील मतदारांची मतदानाविषयीची नाराजी निंदनीय आहे, ही टक्केवारी वाढवण्यासाठी आज सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक आहे.

– जगन घाणेकर


## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश**
**कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ०३/ २०२६**
**श्रीमती राधाबाई बोर्डे व इतर वि. निरंक**

ज्याअर्थी **मयत नामे बाबु पि. आत्माराम बोर्डे** हे/हया दिनांक ०७/०७/२०२३ रोजी मौ. वडगाव ढोक ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, **अर्जदार क्र. १ श्रीमती. राधाबाई बाबु बोर्डे, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम रा. रा. वडगाव ढोक ता. गेवराई जि.बीड, क्र. २ परमेश्वर बाबुराव बोर्डे, वय ४३ वर्षे, धंदा शेती रा. रा. वडगाव ढोक ता. गेवराई जि.बीड, क्र. ३ विनायक बाबुराव बोर्डे, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम रा. रा. वडगाव ढोक ता. गेवराई जि.बीड, क्र. ४ सिमाबाई सुदाम बोडखे, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम रा. लोणाळा ता. गेवराई जि.बीड** यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत बाबु पि. आत्माराम बोर्डे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**पुढील तारीख – ०७/०२/२०२५**
**(मार्फत – ॲड आर.ए. जोशी, गेवराई)**

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गेवराई


# राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब

राजमाता जिजाऊ (जिजाबाई) या हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री आणि शहाजीराजे भोसले यांच्या पत्नी होत्या, ज्यांनी १२ जानेवारी १५९८ रोजी सिंदखेडराजा, बुलढाणा येथे जन्म घेतला; त्या एक कर्तव्यनिष्ठ, स्वाभिमानी आणि दूरदृष्टीच्या माता होत्या, ज्यांनी शिवबांना रामायण-महाभारतातील कथांमधून नीतिमूल्ये शिकवून, धाडस आणि शौर्याचे संस्कार दिले आणि त्यांना स्वराज्याच्या स्थापनेसाठी प्रेरित केले, ज्यामुळे त्या महाराष्ट्राच्या इतिहासातील एक आदर्श आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व बनल्या. जन्म आणि कुटुंब: जन्म: १२ जानेवारी १५९८. जन्मस्थान: सिंदखेडराजा, बुलढाणा जिल्हा, महाराष्ट्र. वडील: लखुजीराजे जाधव (मराठा सरदार).पती: शहाजीराजे भोसले.

जिजाऊंचे योगदान आणि व्यक्तिमत्त्व: प्रेरणादायी माता: जिजाऊंनी शिवाजी महाराजांना केवळ जन्म दिला नाही, तर त्यांना स्वराज्याचे स्वप्न दाखवून ते पूर्ण करण्यासाठी तयार केले. त्यांच्या शिकवणीमुळेच शिवबांमध्ये शौर्य, प्रामाणिकपणा आणि निस्वार्थी वृत्ती विकसित झाली.

नीतिमान संस्कार: त्यांनी रामायण आणि महाभारत यांसारख्या कथांमधून शिवाजी महाराजांना आदर्श राज्यकारभार कसा करावा, हे शिकवले. कर्तव्यनिष्ठ आणि धाडसी: त्या प्रतिकूल परिस्थितीतही कधी हताश झाल्या नाहीत, उलट धीर देऊन पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित करत राहिल्या. त्या एक प्रेमळ माता आणि प्रसंगी कठोर शासकही होत्या.

प्रयत्नवादी: जिजाऊ दैववादी नसून प्रयत्नवादी होत्या, त्यांच्या शिकवणीमुळेच शिवबांनी स्वराज्याची स्थापना केली.

अंतिम क्षण: रायगडावर शिवराज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या बारा दिवसांनी, १७ जून १६७४ रोजी त्यांनी स्वतंत्र हिंदवी स्वराज्यात अखेरचा श्वास घेतला.

सारांश: राजमाता जिजाऊ या केवळ शिवाजी महाराजांच्या माता नव्हत्या, तर त्या रयतेच्या, दीनदुबळ्यांच्या माता होत्या. त्यांच्या शिकवणीने, संस्कारांनी आणि धैर्याने एका महान साम्राज्याची पायाभरणी केली, ज्यामुळे त्या महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर झाल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री व शहाजीराजे भोसले यांच्या ज्येष्ठ पत्नी. महाराष्ट्राच्या इतिहासातील त्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे; कारण त्या केवळ स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या माता नव्हत्या, तर दीनदुबळ्यांच्या. रयतेच्या मातोश्री होत्या.



त्यांचे मूळ घराणे सिंदखेडच्या जाधवराव देशमुखांचे. सुखवस्तू शूर जहागीरदारांचे होते. जिजाऊंची जन्मतारीख व साल यांविषयीची निश्चित माहिती उपलब्ध नाही: तथापि परंपरेचा दाखला देऊन त्यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी झाला, असे काही इतिहासकार मानतात. वडील लखुजी जाधव हे निजामशाहीतील मातब्बर सरदार होते. त्यांच्या चाकरीत असलेले मालोजी भोसले यांचे चिरंजीव शहाजी यांच्याशी इ. स. १६०९-१०. दरम्यान दौलताबाद किल्ल्यात जिजाऊंचा विवाह झाला, असे शिवभारतकार सांगतो. त्या प्रसंगी मुर्थजा निजामशाह हजर होता.

पुढे काही कारणाने भोसले व जाधव या घराण्यांत वैमनस्य आले. जिजाऊ व शहाजीराजे यांचा मुक्काम सुरुवातीस काही वर्षे वेरूळातच होता. पुढे शहाजी आपला मोकासा (जहागिरी) सांभाळून निजामशाहीच्या नोकरीत रुजू झाले. त्या वेळी जिजाऊंची त्यांच्यासोबत भ्रमंती चालू होती. राजमाता जिजाऊ शहाजीराजांच्या पुण्याच्या जहागिरीत इ. स. १६३६ पूर्वीच राहावयास आल्या. पुण्याच्या मुक्कामात त्यांनी बाल शिवाजींना लष्करी शिक्षणाबरोबर रामायण, महाभारत, भागवत आदर्दीतील कथा सांगितत्या. विशेषतः शांतिपर्वातील राजकीय विचार आणि महाभारत युद्ध यांतील कथा सांगितल्या जिजाऊंनी विश्वासू सरदारांच्या मदतीने पुणे जहागिरीची उत्तम व्यवस्था लावली. पुण्यातलालमहाल प्रासाद बांधला, ओसाड जमीन लागवडीखाली आणली. त्यांनी कसबापेठेतील गणपतीची पूजाअर्चा नियमित सुरू केली. इतर मंदिरांतूनही दिवाबत्तीची व्यवस्था केली; तसेच खेड-शिवापूर येथे एक वाडा बांधला. तेथे शहाबाग नावाची उत्तम बाग तयार केली. शहाजींच्या राजकारणाचे, धोरणांचे त्यांना ज्ञान होते. पुणे प्रांताच्या राज्यकारभारातील बारीकसारीक गोष्टींत लक्ष घालून त्यांनी अनेक वेळा न्यायनिवाडे केले. याविषयींचे अनेकविध उल्लेख तत्कालीन पत्रव्यवहारांतून पाहावयास मिळतात. राजगडावर त्यांचा मुक्काम असताना खंडोबाच्या जेजुरी येथील मार्तडमैरव मंदिराच्या गुखपणाविषयी तंटा निर्माण झाला. त्याचा निवाडा जिजाऊंनी केला होता. त्यावर 'मातोश्री साहेब (जिजाऊंनी) जे आश्वासन दिले आहे. तसेच माझेही आश्वासन राहील, असे १३ जुलै १६५३च्या पत्रात छत्रपती शिवाजी महाराज म्हणतात. छत्रपती शिवाजी महाराज मातोश्रींच्या निर्णयास विरोध करत नसत. जिजाऊ महाराजांच्या राज्य कारभारात अखेरपर्यंत (१६७४) जातीने लक्ष घालीत असल्याचे प्रकर्षाने जाणवते. राज्य कारभारात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अनुपस्थितीत त्या राज्याची सर्व जबाबदारी सांभाळत असत. महाराज आग्राभेटीवर गेले असता त्यांनी सर्व कारभाराचा शिक्का जिजाऊंच्या हाती सुपूर्द केला होता आणि त्यांना सहकार्य करण्याचे अभिवचन विश्वासू कारभाऱ्यांकडून घेतले होते. जिजाऊ स्वाभिमानी, धाडसी, करारी, दृढनिश्चयी आणि स्वतंत्र वृत्तीच्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकानंतर १२ दिवसांनी त्यांचे पाचाड (रायगड) येथे निधन झाले.

– काजल प्रफुल्ल पिसाळ, बीड

◆ पान १ वरून पुढे...

### अजित पवार...

गुन्हेगारी, पाणीटंचाई या मुद्द्यांवर रॅप साँगमधून भाजपच्या कारभारावर टीका करण्यात आली आहे. हे गाणं पुणे आणि पिंपरी चिंचवडच्या कारभाराबद्दल आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या कारभाराबाबत हे नसल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. कचरा, वाहतूक कोंडी, तुटलेले रस्ते, पाणीटंचाई , गुन्हेगारी हे पुण्याचे अलार्म आहेत असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले. आपण जे गाणं तयार केलं आहे ते पुणे आणि पिंपरी चिंचवडपुरते मर्यादित आहे. केंद्र आणि राज्य सरकार याचा कुठेही संबंध नाही असे अजित पवार म्हणाले. पालिकेत मोजक्याच लोकांना टेंडर दिले जाते त्याचा फटका नागरिकांना बसतो असेही अजित पवार म्हणाले.

### पोटच्या मुलीवर...

न्यायालयाने आरोपीला पोक्सो कायद्याच्या कलम १० अंतर्गत ७ वर्षे सक्तमजुरी आणि कलम १२ अंतर्गत ३ वर्षे सक्तमजुरी, तसेच भारतीय न्याय संहितेच्या कलम ११५ अंतर्गत सहा महिने शिक्षेचे आदेश दिले आहेत. यासोबतच आरोपीला आर्थिक दंड आणि पीडितेला नुकसान भरपाई देण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. या खटल्यात सरकारी अभियोक्ता ए. बी. तिडके यांनी सरकार पक्षातर्फे प्रभावी युक्तीवाद केला, तर श्रेणी पोलीस उपनिरीक्षक गोविंद सानप यांनी पैरवी अधिकारी म्हणून महत्त्वाची जबाबदारी पार पाडली.

### सरपंच संतोष....

अर्ज केला आहे. त्याच्या वकिलांमार्फतही यासंदर्भात विनंती करण्यात आली असून, सुरक्षेच्या किंवा इतर कारणास्तव हा बदल मागितल्याचे

◆ पान १ वरून पुढे...

समजते. सरकारी पक्षाकडून पुराव्यांची यादी सादर आजच्या सुनावणीत सरकारी पक्षाने कलम ३३० नुसार कागदपत्रांवर आधारित पुराव्यांची सविस्तर यादी कोर्टासमोर सादर केली. या पुराव्यांच्या यादीवर आता आरोपी पक्षाला आपले म्हणणे मांडायचे असून, कोर्टाने त्यांना तशा सूचना दिल्या आहेत. दरम्यान, ९ डिसेंबर २०२४ रोजी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची अमानुष हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात वाल्मीक कराडसह अनेक आरोपी अटकेत आहेत. या प्रकरणाचा तपास सीआयडी करत आहे. या प्रकरणातील तांत्रिक पुरावे आणि डिजिटल डेटा खटल्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

### पुढील गुरुवारी....

महत्त्वाची बाब म्हणजे १५ जानेवारी रोजी बँका आणि शेअर बाजार सुरू राहण्याची शक्यता आहे. कारण आरबीआयकडून अद्याप या दिवशी बँक सुट्टी जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे बँकिंग व्यवहार आणि शेअर बाजाराचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरू राहणार असल्याचे समजते.
राज्य सरकारने डिसेंबर महिन्यात २०२६ सालासाठी २४ सार्वजनिक सुट्ट्यांची यादी जाहीर केली होती. मात्र त्या यादीत १५ जानेवारीच्या सुट्टीचा समावेश नव्हता. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्रपणे हा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती अधिकृत प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. महापालिका निवडणुकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार असून त्याचे निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर करण्यात येणार आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३० डिसेंबर २०२५, तर अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत २ जानेवारी होती.

### बीडच्या माजलगावमध्ये...

यातील मुज्जम्मिल नूर व अहमदुद्दीन काझी या दोघांना ताब्यात घेतल्याची

◆ पान १ वरून पुढे...

माहिती आहे. या संदर्भाने मिळालेल्या माहितीनुसार वरील आरोपींनी पात्रुडमध्ये गुलजार ए रझा या नावाच्या ट्रस्टचा फलक लावला होता. निती आयोगाच्या नियमानुसार ट्रस्टची नोंदणी दर्पण पोर्टलवर करणे आवश्यक आहे. मात्र, गुलजार ए रझाचे चुकीच्या पद्धतीने नोंदणी केल्याचे कागदपत्रांच्या पडताळणीमध्ये आढळून आले. या न्यासाच्या नावाने लातूरमधील क्सिस बँकेमध्ये पाच बोगस खाते तयार करण्यात आले होते. त्यामध्ये चार कोटी रुपये जमा करण्यात आले होते. हा निधी धार्मिक कामाच्या संदर्भाने जमा करण्यात येत असल्याची माहिती आहे. गुलजार ए रझाची बीड जिल्ह्यातील सर्व आकरा तालुक्यांमधील दुय्यम निबंधक कार्यालयांकडून माहिती घेतली असता तेथेही त्यांची नोंदणी आढळून आली नाही. महाराष्ट्रामध्ये कोणत्याही ट्रस्ट किंवा संस्थेने त्यांची डीड नोदणी धर्मादाय आयुक्तांकडे करणे आवश्यक आहे. धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडूनही वरील ट्रस्टची माहिती घेतली असता त्यांच्याकडे नोंदणी नसल्याचे कळवले आहे, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. ज्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल आहे तो इम्रान शेख हा गुलजार ए रझा ट्रस्टचा अध्यक्ष, सय्यद मुज्जम्मिल हा उपाध्यक्ष, असमदुद्दीन कैसर काझी हा सचिव तर तौफीक काझी याचा विश्वस्त म्हणून बँकेच्या खात्यांमध्ये नोंदणी असल्याची माहिती पुढे आली आहे.

### दु:खावर फुंकर...

राबविला.या मदत फेरीत सामाजिक कार्यकर्त्यांचाही सक्रीय सहभाग लाभला. या संवेदनशील आणि कृतिशील उपक्रमामुळे पत्रकारिता ही केवळ शब्दांची नसून, गरजेच्या वेळी धावून येणारी माणुसकी असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. पत्रकारांच्या या आदर्श भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत असून, अजूनही माणुसकी जिवंत आहे याची प्रचिती समाजाला मिळाली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### आत्माराम वाव्हळ..

पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे. या वर्षीचा मानाचा समजला जाणारा लोक रत्न पुरस्कार मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता एका भव्य कार्यक्रमात बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, बीड नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडशे, पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मारोती खेडकर, प्रसिद्ध वैद्यकीय तज्ञ डॉ. रमेश घोडके, डॉ उर्मिला घोडके, सामाजिक कार्यकर्त्या सीमा ओस्तवाल, मयुरी बांगर, निलाफर शेख मॅडम, तसेच प्रतापराव साळुंके, नवनाथ अण्णा शिराळे आणि भागवत वैद्य, यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करून त्यांच्या गौरव करण्यात आला. या सन्मानामुळे श्री आत्माराम वाव्हळ यांच्या शैक्षणिक, सामाजिक व पत्रकारितेतील कार्याची पोचपावती मिळाल्याची भावना व्यक्त होत असून, सध्या त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### एस पी साहेब....

वर चंद्रकांत गोसावी ची त्याच्या अकार्यशैलीची गौरव गाथा माध्यमांनी अनेक वेळा मांडली.पण पिंडीवरच्या विंचवाला ठेचायचं कसं हे माध्यमांना देखील कळालं नाही. शेवटी अनेकांनी आपल्याच पापाचे भोग आहेत म्हणून घडतय ते घडू द्या म्हणून गोसावी चा नंगानाचाकडे दुर्लक्ष केलं.पण लोकाभिमुख प्रशासनाचा ढोल वाजवला त्यामुळे सत्य सांगण्यासाठी अशा गोष्टी पुढे आणण्याची वेळ सह्याद्री माझावर आली. नेकनूर पोलीस ठाणे हद्दीतील घारगाव येथील अंजना दगडू बन या ७८ वर्षाच्या आज्जीवर न्यायासाठी आत्मदहनाची वेळ चंद्रकांत गोसावी यांनी आणली अंजना बन या गावाकडे एकट्याच राहतात परडी चा जोगवा मागून उदरनिर्वाह करतात परडी हेच एकमेव त्याचं जगण्याचं साधन. घरी कुणीच नसल्यामुळे मंदिरात झोपण्याच्या कारणावरून गणेश अंकुश सपकाळ याने मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. नुसती धमकीच दिली नाही तर नाकातली सोन्याची मोरणी काढून घेतली. याची रीतसर तक्रार नेकनूर पोलीस ठाण्याला दिली. तक्रारीला दीड महिना उलटून गेला मात्र कुठलीच कारवाई झाली नाही. चौसाळा पोलीस चौकीचा जमादार गर्जे याने तक्रार करणाऱ्या आज्जीलाच दापदडप करायला सुरुवात केली. चोराला मेसाई धार्जिन या म्हणीप्रमाणे चोराला गोसावी धार्जीन असं म्हणण्याची वेळ आणली. आज्जीने चंद्रकांत गोसावी ची देखील भेट घेतली. नातवासारख्या असलेल्या गोसावींनी देखील आज्जीची फरपटच केली. गर्जेची व आरोपीची बाजू घेतली. शेवटी अंजना बन यांनी २९ डिसेंबर २०२५ रोजी येत्या आठ दिवसात गर्जे साहेब व गोसावी तसेच आरोपीवर कारवाई केली

◆ पान ४ वरून पुढे...

नाही तर ११ जानेवारी २०२६ ला नेकनुर पोलीस ठाण्यात आत्मदहन करणार असल्याच निवेदन पोलीस अधीक्षकांना दिलं. पोलीस अधीक्षकांनी देखील पिंडीवरच्या विंचवालाच नेहमीप्रमाणे वरदान दिलं. निवेदन देऊन दहा-बारा दिवस होत आले तरी कुठलीच कारवाई कांवत यांनी देखील केली नाही. आत्मस्तुतीच्या ढोलाच्या आवाजात म्हाताऱ्या जोगवा मागून खाणाऱ्या निराधार आज्जीची आर्त हाक स्वतःला कर्तव्यदक्ष समजणाऱ्या पोलीस अधीक्षकांच्या कानावर गेली नाही. जर इतकी बिकट परिस्थिती असेल तर पोलीस अधीक्षकांनी प्रशासनाला लोकाभिमुख केल्याचे ढोल वाजवणं बंद करावं अशी मागणी जनतेतून केली जाऊ लागली आहे.

### अपार कष्टातून ...

जलनायक मयंक गांधी यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून देशाला बदलायचे स्वप्न पाहिले. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली तरच देशाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो असे त्यांचे ठाम मत आहे. आजमित्तीस संस्थेसोबत ४० हजार पेक्षा जास्त सक्रिय शेतकरी जोडले गेले असून, फळबाग लागवडीच्या माध्यमातून त्यांचे उत्पन्न दहा पटींनी वाढल्याचे निष्कर्ष समोर आले आहेत. केज तालुक्यातील युसुफ वडगाव (सादोळा) येथे संस्थेच्या मार्फत अनेक शेतकऱ्यांनी केळीची लागवड केली असून, त्यांनी पिकवलेली उच्च दर्जाची केळी आता इराणला निर्यात होत आहे. केतन सतीश शिंदे हे त्यापैकीच एक शेतकरी आहेत. शिंदे यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये ५५ गुंठे जमिनीवर ६ द ५ अंतरावर केळीची लागवड केली. लागवडीपासूनच निर्यात दर्जाचे उत्पन्न कसे घ्यावे? यासंदर्भात ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून मार्गदर्शन देण्यात आले. संस्थेच्या सिरसाळा येथील कृषीकुल या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रात त्यांना दोन दिवसीय केळी लागवड प्रशिक्षणही देण्यात आले. ५५ गुंठे क्षेत्रात प्रति झाड २५ किलो प्रमाणे त्यांना उतारा आला असून, आत्तापर्यंत १८ टन केळीचे निर्यात दर्जाचे उत्पन्न झाले असून, पुढील काही दिवसांत जवळपास २० टन केळीची काढणी करून निर्यात होईल अशी त्यांना दृढ अपेक्षा आहे. निर्यात झालेल्या केळीला प्रति किलो १८.५ एवढा दर मिळाला असल्याचेही शिंदे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.
=८ ग्लोबल विकास ट्रस्टच्या सहकार्यामुळेच उत्पन्न वाढले – सतीश शिंदे ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आम्हाला आमच्या बांधावरच थेट अल्प दरात रोपे मिळाली. माझा मुलगा केतन च्या नावे असलेल्या ५५ गुंठे जमिनीवर आम्ही २००० रोपांची लागवड केली. सुरुवातीला कृषीकुल येथे दोन दिवसांचे मोफत मार्गदर्शन आम्हाला मिळाले. त्याचबरोबर संस्थेच्या तज्ञांनी आम्हाला बांधावर येऊन प्रत्यक्ष निर्यात दर्जाचे उत्पन्न कसे घ्यावे

◆ पान ४ वरून पुढे...

यासंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष मयंक गांधी सर आणि ग्लोबल विकास ट्रस्टने केलेल्या मदतीमुळे आमच्या उत्पन्नात कमालीची वाढ झाली. त्यांच्या सहकार्यामुळेच आमच्या गावातील अनेक शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती आली असल्याची प्रतिक्रिया शेतकरी केतन शिंदे यांचे वडील सतीश शिंदे यांनी व्यक्त केली.

### आष्टीत श्रीराम....

आसन व्यवस्था अंतिम टप्प्यात असून
सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्या गठित करण्यात आल्या असून, स्वागत, शिस्त, प्रसाद वाटप, वाहनतळ व्यवस्था, आरोग्य व स्वच्छता या सर्व बाबींचे नियोजन काटेकोरपणे केले जात आहे. कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला निघणाऱ्या आकर्षक शोभायात्रेचीही तयारी देखील जोमात सुरू आहे.श्रीराम कथेमुळे आष्टीत भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा जागर होणार असून भक्ती, उत्साह आणि अध्यात्माचा संगम अनुभवायला मिळणार आहे. दिनांक ११ ते १७ जानेवारी दरम्यान दररोज दुपारी १२.३० ते सायंकाळी ४ या वेळेत श्रीराम कथा होणार असून, मकर संक्रांतीच्या दिवशी (१४ जानेवारी) सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत विशेष कथा आयोजित करण्यात आली आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने आष्टीसह परिसरातील २० ते २५ गावांतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचा अंदाज असून, त्या अनुषंगाने सर्व सुविधा पुरविण्यावर भर देण्यात येत आहे. यावेळी आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, श्रीराम कथेच्या माध्यमातून समाजात भक्ती, संस्कार व सद्विचारांचा प्रसार व्हावा, हा आमचा उद्देश आहे. सर्व भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून या आध्यात्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आ.सुरेश धस आणि मराठवाडा भूषण लोकनेते आ.सुरेश धस प्रतिष्ठानच्या संयोजन समितीने यांनी केले आहे.

### महात्मा फुले...

तालुक्यातील माळी समाजाच्या समस्या व प्रश्न सोडवण्यासाठी सदैव तत्पर आहे अशी ग्वाही राजेश कातखडे यांनी दिली आहे. ते पत्रकारीतेच्या माध्यमातून शेतकर्यांचे प्रश्न, सामाचाचे प्रश्न निर्भयप्रमाणे मांडत असतात, त्यामुळे शिरूर तालुक्यातील माळी समाजाच्या हक्कासाठी लढा देणार्या कार्याला नवी दिशा मिळेल अशी आशा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. या निवडीबद्दल महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड. सतीश शिंदे व जिल्हाप्रमुख अजय शिंदे व शिरूर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. ०९ जानेवारी २०२६ ● पान ४

## आत्माराम वाव्हळ यांच्या शिक्षण व पत्रकारितेतील योगदानाची दखल

### आत्माराम वाव्हळ यांना 'लोकरत्न पुरस्कार' प्रदान



**बीड । प्रतिनिधी**

दर्पण दिनाचे औचित्य साधून लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'लोकरत्न पुरस्कार' पत्रकार

तथा बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांना मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी दर्पण दिनी बीड शहरातील सोमेश्वर मंदिर येथे आयोजित भव्य-दिव्य समारंभात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल आत्माराम वाव्हळ यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दर वर्षी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना लोकरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. याच अनुषंगाने शिक्षण, समाजसेवा व पत्रकारितेच्या माध्यमातून सातत्यपूर्ण आणि संघर्षमय योगदान देणाऱ्या श्री आत्माराम वाव्हळ यांची या वर्षी लोक रत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. राज्यातील विना अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनासह विविध प्रश्नांसाठी सातत्याने लढा देत असताना, पत्रकारितेच्या माध्यमातून शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य आत्माराम वाव्हळ सर यांनी केले आहे. बीड तालुक्यातील शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात ते कार्यरत आहेत. आता पर्यंत त्यांना आदर्श शिक्षक, आदर्श मुख्याध्यापक, तसेच आदर्श पत्रकार व संपादक अशा विविध ▶▶ उर्वरित पान २ वर

# एस पी साहेब अजून किती देणार लाडक्या गोसावींना पाठबळ



## ७८ वर्षाच्या आज्जी न्यायासाठी आत्मदहन करायला हतबल

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी पोलीस प्रशासन किती लोकाभिमुख केलं याची टिमकी नववर्षाच्या स्वागताला वाजवली त्याचा भांडाफोड करण्याची वेळ आली आहे. एसपींच्या खास मर्जीतले नेकनूर चे ठाणे प्रमुख चंद्रकांत गोसावी यांनी ७८ वर्षीय अंजना बन नावाच्या आज्जीला न्यायासाठी आत्मदहन करण्याची वेळ आणली आहे. ११ जानेवारीला नेकनूर पोलीस ठाण्यासमोर आत्मदहनाचा इशारा १० दिवसापूर्वीच देऊनही पोलीस अधीक्षकांनी देखील कुठलीच दखल घेण्याची तसदी घेतली नसल्याचं पाहायला मिळत आहे. बीड जिल्ह्यात खून, दरोडे, चोऱ्या, गोळीबार, अपहरण, राजरोस चालणारे अवैध धंदे यांच्यापुढे हे प्रकरण तसं पाहिलं तर अतिशय क्षूल्लक आहे.पण पोलीस अधीक्षकांनी नववर्षाच्या स्वागतालाच किती लोकाभिमुख कामं केली आहेत.पोलीस प्रशासन किती सतर्क आहे. याचा ढोल वाजवला. तो वाजवायला ही हरकत नाही. पण कायदा सुव्यवस्था आणि एस पी चा आदेश कितपत मानला जातो. हा खरा प्रश्न सगळ्याच परिस्थितीतून निर्माण होतो. एसपींनी मर्जीतली माणसं अनेक ठिकाणी जनतेच्या माथी बळच मारली. अनेक वेळा कंट्रोलला बसवा असे सांगूनही एसपींनी त्यांच्या विनंतीला मान दिला नाही. मग काय? नंगा नाच करायला अख्खं रान यांना कमी पडू लागलं. अवैध धंद्यांची भरमार झाली. त्यातून स्वतःचे बंगल्यांचे इमले बांधले गेले. ही कहाणी आहे एसपींच्या मर्जीतल्या नेकनूरच्या ाणे प्रमुख ▶उर्वरित पान २

# माजलगावात खुल्या क्रिकेट स्पर्धेचा थाटात समारोप

### जयसिंह सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन; मान्यवरांच्या उपस्थिती प्रथम बक्षीस ११११ तर द्वितीय ५५५५ रूपयांचे बक्षीस वितरण

**माजलगांव । प्रतिनिधी**

माजलगाव मतदारसंघाचे युवा नेते मा. जयसिंह सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या खुल्या क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना मोठ्या उत्साहात पार पडला.काल दि.७ जानेवारी रोजी या स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रम नगरसेवक शेख आसेफ भाऊ आणि नगरसेवक सय्यद रफीक भाई यांच्या शुभहस्ते पार पडला.



या स्पर्धेत माजलगांव तालुक्यातील विविध संघांनी सहभाग घेतला होता. अंतिम सामना अत्यंत चुरशीचा ठरला. उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजयी संघाने प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धेतील प्रथम पारितोषिक नगरसेवक सय्यद रफीक भाई यांच्या वतीने, तर द्वितीय पारितोषिक अभिजीत जाधव यांच्या वतीने विजेत्या संघास प्रदान करण्यात आले.

यावेळी युवा नेते राजुभाई कुरेशी, पत्रकार शेख अखिल भाई, इमरान इब्बू खान, अदिल काझी, ज्ञानेश्वर विघ्ने यांच्यासह अनेक मान्यवर व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान बोलताना मान्यवरांनी सांगितले की, अशा क्रीडा स्पर्धांमुळे युवकांमध्ये खेळाची आवड निर्माण होते, संघभावना वाढीस लागते आणि सकारात्मक ऊर्जा मिळते. जयसिंह सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक सलोखा आणि युवक सक्षमीकरणासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचेही त्यांनी नमूद केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक समितीचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. खेळाडू, प्रेक्षक आणि आयोजकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे स्पर्धेचा समारोप आनंदी व उत्साही वातावरणात झाला.



*बीड: युवा उद्योजक मा संजय बापु पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले , बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंके पाटील, युवक जिल्हाध्यक्ष भागवत राव मस्के पाटील , बीड शहर अध्यक्ष दत्ता शेळके पाटील, प्रा.दत्तात्राव काळे पाटील, बाळासाहेब देवगुडे आदि मित्र उपस्थित होते.*

## अपारकष्टातूनघामाचेझालेमोती केतन सतीश शिंदे यांची यशोगाथा; ग्लोबलच्या केळीची विदेशात निर्यात



**परळी वै. । प्रतिनिधी**

जिद्द, कसोटी आणि नवे बदल स्विकारण्याची तयारी असेल तर यश हमखास मिळते आणि त्यातूनच केलेल्या कष्टाचे चीज होते. याचा अनेक उदाहरणातून अनेकांना प्रत्यय आलेला आहे. अशीच यशोगाथा युसुफ वडगाव (सादोळा) येथील शेतकऱ्यांची आहे. ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून येथील शेतकरी केतन सतिश शिंदे यांना अल्प दरात केळीची रोपे देण्यात आली, लागवडीपासून वेळोवेळी त्यांना केळी संगोपनाचे प्रशिक्षण देण्यात आले. शिंदे यांनी अपार कष्टाने हे पिक घेतले आणि जोपासले. त्यांनी गाळलेल्या घामाच्या प्रत्येक थेंबाचा आज मोती झाला असून त्याचा इतर शेतकऱ्यांनी आदर्श घ्यावा असे यश त्यांनी मिळवले आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर

## महात्मा फुले युवा दल शिरूर तालुका प्रमुखपदी राजेश कातखडे यांची निवड

**शिरूर । प्रतिनिधी**



महात्मा फुले युवा दलाच्या शिरूर तालुका प्रमुखपदी गोमळवाडा येथील राजेश कातखडे यांची निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. कारण राजेश कातखडे है शिरूर तालुक्यात सर्वत्र परिचित आहेत. युवा नेतृत्व, धडाडीचे नेतृत्व याचीच दखल घेऊन महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सतिश शिंदे यांच्या आदेशावरून व बीड जिल्हा प्रमुख अजय शिंदे यांनी आज बुधवार रोजी शिरूर तालुका प्रमुखपदी राजेश कातखडे यांची निवड करण्यात आली आहे. महात्मा फुले युवा दलाचे प्रमुख उद्दिष्ट दुर्बल, शोषित, गोरगरीब घटकांच्या हक्कासाठी आवाज उठवणे, सामाजिक न्यायासाठी कार्य करणे, समाजहित जोपासणे, तसेच समाजाच्या अडीअडचणीच्या काळात नागरीकांच्या पाठीशी उभे राहणे हे आहे. या निवडीमुळे शिरूर ▶▶ उर्वरित पान २ वर

# आष्टीत श्रीराम कथेचे आ. सुरेश धस यांच्या संयोजकत्वाखाली जय्यत तयारी सुरु



### श्रीराम कथेमुळे भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा जागर

**आष्टी । प्रतिनिधी**

आमदार सुरेश धस प्रतिष्ठान यांच्या वतीने आष्टी येथे येत्या ११ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या भव्य श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यासाठी जोरदार तयारी सुरू असून, संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून हा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम साकार होत आहे. या श्रीराम कथेचे निरूपण देवदास स्वामी मठ, दादेगाव येथील परमपूजनीय महंत मंदार महाराज रामदासी करणार असून, कार्यक्रमासाठी आष्टी पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात १५०÷३०० फुटाचा भव्य मंडप उभारणी, ध्वनिव्यवस्था, प्रकाशयोजना तसेच भाविकांच्या बसण्याची ▶▶ उर्वरित पान २ वर

## हरवले आहेत



**बीड । प्रतिनिधी**

ज्ञानेश्वर रघुनाथ मुंडे हे दि. ०७/०१/२०२६ बुधवार रोजी अकरा वाजल्यापासून बेपत्ता आहेत स्वभाव थोडा भोळसर आहे. जर कोणाला दिसल्यास या नबंर वर फोन करा ही कळकळीची विनंती आहे. मो.७७९८४१४५४५, ९४२१४१४११९.

Reg. No. BHR/BHR/RSR (SR)/413/2015

## मराठवाडा अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. बीड

सम्राट चौक, शाहूनगर, बीड -४३११२२ (महाराष्ट्र) फोन न. ०२४४२- २३०२५१

मराठवाड/ अर्बन / २०२५ २०२६ / दिनांक : ०८ / ०१ / २०२६

### विशेष सर्वसाधारण सभेची नोटिस
(फक्त सभासदांसाठी)

मराठवाडा अर्बन को ऑप क्रेडीट सोसायटी लि. बीड चे सर्व सन्माननिय भागधारक सभासदांना कळवण्यात येते की, संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा संस्थेच्या सन्माननीय अध्यक्षा मा. सौ. संजीवनी शिवाजी देसाई यांचे अध्यक्षतेखाली **दिनांक २४/०१/२०२६ वार शनिवार** रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालय, गिल्डा कॉम्प्लेक्स, सम्राट चौक, शाहुनगर, बीड येथील मुख्य कार्यालयाचे वरती सभेचे आयोजन खालील विषयावर चर्चा करणेसाठी करण्यात आलेले आहे.

तरी संस्थेच्या सर्व भागधारक सभासदांनी विशेष सर्वसाधारण सभेस वेळेवर उपस्थितीत राहवावे ही विनंती.

● **सभेपुढील विषय :-**

विषय क्र. ०१ - मागील सभा दि. २७/०७/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणेबाबत.
विषय क्र .०२ - संस्थेस सुधारित आदर्श उपविधि स्विकारणे बाबत.
विषय क्र. ०३- मा. अध्यक्षाचे परवानगीने येणारे ऐन वेळेसचे विषय.

दिनांक:- ०८/०१/२०२६
स्थळ :- बीड

**मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

● **सभासदांना नम्र सूचना-**

१. संस्थेच्या ज्या सभासदांनी आपला ई-मेल आय डी किया मोबाईल क्रमांक या बाबतची माहिती संस्थेच्या मुख्य कार्यालय गिल्डा कॉम्पलेक्स, सम्राट चौक. शाहूनगर, बीड येथे देण्यात यावा.
२. विशेष सर्वसाधारण सभेच्या वेळी ज्या सभासदास सभेपूढे असलेल्या विषयाबद्दल काही माहिती विचारावयाची असल्यास त्यांनी दि १७/०१/२०२६ पर्यंत मुख्य कार्यालयास लेखी कळवावे अन्यथा त्यांचा विचार केला जाणार नाही.
३. आवश्यकता असलेल्या कोरम सभेच्या सुरुवातीस नसल्यास सभेच्या कामास अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी सभेस सुरुवात केली जाईल त्या सभेस पोटनियम ३५ (३) प्रमाणे कोरमची आवश्यकता असणार नाही.
४. सभासदांनी आपल्या वारसाची नोंद करून घ्यावी.
५. आपले भाग प्रमाणपत्र शाखेतून हस्तगत करावेत.

## सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य

# राष्ट्रीय रेबीज नियंत्रण कार्यक्रम

रेबीज हा एक जीव घेणा आजार आहे आपण हा आजार सहज टाळू शकतो





- कुत्रा किंवा इतर प्राणी चावल्यामुळे झालेली जखम साबण आणि नळाच्या वाहत्या पाण्याने स्वच्छ धुवा.
- जखमेला निर्जंतुक मलम लावा.
- जखमेला मिरची, तेल, चुना असे कोणतेही घातक पदार्थ लावू नका.
- ताबडतोब शासकीय दवाखान्यात जा आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने रेबीज विरोधी लस घ्या.
- लसीच्या वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करा.
- आपल्या घरातील पाळीव प्राण्यांचे वेळोवेळी रेबीज विरोधी लसीकरण करा.

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जिल्हा परिषद, बीड